महाराष्ट्र शासन

**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद**

पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५

दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९

इमेल: roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org


जा.क्र. : विकाऔ/शिक्षण/२०२०/१३३ दिनांक : 20/04/2020

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित पदविका/पदवी/पदयुत्तर पदवी
व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था,
औरंगाबाद विभाग.

विषयः- आपल्या संस्थेत /कार्यालयात Roof Water Harvesting करणे व सोलार सिस्टीम बसविणे बाबत.

संदर्भः- दि. ०९.०३.२०२० रोजी विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद येथे विभागीय लोकशाही दिन व सर्व प्रादेशिक विभाग प्रमुखांच्या घेण्यात आलेल्या बैठकीचा इतिवृत्तांत.

उपरोक्त संदर्भीय विषयी दि. ०९.०३.२०२० रोजी विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद येथे विभागीय लोकशाही दिनानिमित्त विभागातील सर्व प्रादेशिक विभाग प्रमुखांची बैठक उप आयुक्त (सामान्य प्रशासन) यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. वृक्षारोपन, विशाखा समिती, करोना विषाणू, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, Roof Water Harvesting करणे व सोलार सिस्टीम बाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार सर्व प्रादेशिक प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील संस्थेत/कार्यालयात यापूर्वी Roof Water Harvesting करण्यात आलेली नसेल त्यांनी तात्काळ करुन घ्यावे. तसेच ज्या कार्यालयामध्ये Roof Water Harvesting केलेले आहे तथापी ते कार्यान्वीत आहे किंवा कसे या बाबतचा अहवाल सादर करणेबाबत कळविले आहे.

सोलार सिस्टीम ही संकल्पना सर्व शासकीय कार्यालयात सुरु करणे आवश्यक आहे. त्यामुळे विजेची बचत होईल व शासनाच्या खर्चात बचत होईल या उद्देशाने सर्व प्रादेशिक विभाग प्रमुख व त्यांच्या अधिनस्त सर्व कार्यालयांनी या बाबत महाउर्जा विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांचे कार्यालयाशी संपर्क साधुन सोलार सिस्टीम बसवण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी असे आदेश उप आयुक्त (सामान्य प्रशासन) दिलेले आहेत.

त्यानुसार आपल्या संस्थेमध्ये/कार्यालयामध्ये Roof Water Harvesting करण्यात यावी व सोलार सिस्टीम बसविण्याबाबतची कार्यवाही करण्यांत यावी व त्याचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**(महेश शिवणकर)**
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत : या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर अपलोड करण्यास्तव.